**महाराष्ट्र शासन**
**वनविभाग**
**मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे वनवृत्त, ठाणे**

-----------------------------------

# वनरक्षक भरती प्रक्रिया २०१६

## उमेदवारांकरीता सूचना

ठाणे वनवृत्तातील वनरक्षक संवर्गातील अनुसूचित क्षेत्र (ठाणे व पालघर जिल्हा) व बिगर अनुसूचित क्षेत्रातील रिक्त पद भरती प्रक्रियेअंतर्गत उमेदवारांची कागदपत्र तपासणी घेण्यात आली असून कागदपत्र तपासणीअंती पात्र/अपात्रतेबाबतचा निकाल संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेला आहे.

**अ) वनरक्षक भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्याकरीता कागदपत्र तपासणी अंती पात्र उमेदवारांची शैक्षणिक अर्हता परीक्षेमध्ये प्राप्त गुणांचे ८७.५% भारांकन व शासन पत्र दिनांक २१/०७/२०१४ अन्वये ५ कि.मी. / ३ कि.मी. धावण्याच्या चाचणीमध्ये मिळालेल्या गुणांची बेरीज करुन यादी सोबत प्रसिध्द केली आहे.**

१/- वनरक्षक पदाकरीता जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक अर्हता उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १२ वी) विज्ञान किंवा गणित किंवा भूगोल किंवा अर्थशास्त्र या विषयासह परीक्षा उत्तीर्ण व अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमातीचे उमेदवार व माजी सैनिकांकरीता शैक्षणिक अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १० वी) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. त्यामुळे निवडयादी तयार करतेवेळी बिगर अनुसूचित क्षेत्रातील उमेदवारांकरीता एच.एस.सी. च्या (इ. १२ वी ) गुणांची टक्केवारी (पर्यावरण विषय वगळून) व अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमातीचे उमेदवारांकरीता एस.एस.सी. च्या (इ. १० वी ) ६ विषयांपैकी जास्त गुण प्राप्त झालेल्या ५ विषयांचे गुण (best of five subjects चे प्रतिशत गुण) अशी गुणांची टक्केवारी विचारात घेण्यात आली असून सदर गुणांच्या टक्केवारीस ८७.५% भारांकनाप्रमाणे गुण देण्यात आलेले आहेत.

२/- बिगर अनुसूचित क्षेत्रातील उमेदवारांचे उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १२ वी) गुणांची टक्केवारी ही ६०० गुणांपैकी प्राप्त गुणांनुसार पर्यावरण विषयाचे गुण वगळून दर्शविण्यात येऊन त्याप्रमाणे ८७.५% भारांकन दिलेले आहे.

३/- माजी सैनिक उमेदवारांचेबाबतीत केवळ माजी सैनिक या समांतर आरक्षणाचे पदाकरीता एस.एस.सी.चे ६ विषयांपैकी जास्त गुण प्राप्त झालेल्या ५ विषयांचे गुण (best of five subjects चे प्रतिशत गुण) अशी गुणांची टक्केवारी विचारात घेऊन सदर गुणांचे टक्केवारीस ८७.५% भारांकनाप्रमाणे गुण देण्यात आलेले आहेत.

४/- धावण्याची चाळणी चाचणी ५ कि.मी / ३ कि.मी. अंतर ३० मिनिटांत पूर्ण करणेकरीता १२.५% भारांकनानुसार शासन पत्र क्रमांक एफएसटी-०७/११/प्र.क्र.२८७/फ-४, दि. २१.०७.२०१४ प्रमाणे कमीत कमी वेळात स्पर्धा पूर्ण केलेल्या १ ते ४० उमेदवारांना गुण देण्यात आलेले आहेत व त्यापुढील सर्व उमेदवारांना शून्य गुण देणेत आलेले आहेत.

**ब)** **पुरुषांसाठी २५ कि.मी. / महिलांसाठी १६ कि.मी. अंतर चार तासात पूर्ण करण्याची शारीरिक क्षमता चाचणीसाठी गुणानुक्रमे पात्र ठरलेल्या उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादी सोबत प्रसिध्द केली आहे. सदर यादीमध्ये समाविष्ट असलेल्या व प्रतिक्षा यादीतील सर्व पुरूष उमेदवारांना २५ कि.मी. चालणे व महिला उमेदवारांना १६ कि.मी. चालणे अशी शारीरिक क्षमता चाचणी ४ तासांमध्ये पूर्ण करणे आवश्यक आहे.**

पुरुष उमेदवारांकरीता २५ कि.मी. / महिला उमेदवारांकरीता १६ कि.मी. चालण्याची शारीरिक क्षमता चाचणीकरीता पात्र उमेदवारांकरीता सूचना खालीलप्रमाणे आहेत.

१/- २५ कि.मी.पुरूष उमेदवारासाठी व १६ कि.मी. स्त्री उमेदवारासाठी चालण्याची शारिरिक क्षमता चाचणी चार तासांमध्ये पुर्ण करणेसाठी उमेदवारांची निवड यादी तयार करुन त्यामध्ये प्रतिक्षा सूचीतील उमेदवारांचाही समावेश केलेला आहे. केवळ प्रतिक्षासूचित समावेश झालेला आहे तसेच २५ कि.मी./१६ कि.मी. चालण्याची चाचणी पूर्ण केल्याने प्रतिक्षासूचीतील उमेदवारांना वनरक्षक पदासाठी नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही.

२/- माजी सैनिकांचे समांतर आरक्षणामध्ये खालीलप्रमाणे उमेदवार उपलब्ध न झाल्याने सदरची ११ पदे रिक्त ठेवण्यात आलेली आहेत.

| **अ.क्रं.** | **तपशील** | **माजी सैनिक समांतर आरक्षणातून उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे रिक्त पदसंख्या** |
|---|---|---|
| १. | अनुसूचित क्षेत्र (ठाणे जिल्हा ) | ३ |
| २. | अनुसूचित क्षेत्र (पालघर जिल्हा ) | ८ |
| | **एकूण** | **११** |

३/- समांतर आरक्षणातील जे उमेदवार उपलब्ध झालेली नाहीत ती पदे त्याच प्रवर्गाचे सामाजिक आरक्षणातून भरणेत आलेली आहेत.

४/- शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दि. ०१/०७/२०१६ मधील तरतुदीनुसार खेळाडू या समांतर आरक्षणातून अर्ज केलेल्या उमेदवारांचा खेळविषयक पडताळणी प्रमाणपत्राबाबत आवश्यकता पडल्यास संबधित विभागीय उप संचालक यांचेकडून पुन्हा शहानिशा करणेचे अधीन राहून निवडयादीमध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

५/- श्रीमती छाया कालिदास उबाळे, चेस्ट क्रमांक २५०४० यांनी खेळाडू या समांतर आरक्षणातून अर्ज केला असून त्यांनी सहा. आयुक्त नवोदय विद्यालय समिती, पुणे यांनी दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत सादर केली आहे. तथापि श्रीमती उबाळे यांचे नवोदय विद्यालयातून खेळाडूचे प्राप्त प्रमाणपत्र उप संचालक, क्रीडा व युवक सेवा, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी पडताळणी करता येत नाही असे कळविले आहे. तरी श्रीमती उबाळे यांनी सहा. आयुक्त नवोदय विद्यालय समिती, पुणे यांचेकडील सादर केलेल्या प्रमाणपत्राचे सक्षम प्राधिकाऱ्याकडून पडताळणीचे अधीन राहून निवडयादीमध्ये त्यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

**६/- उमेदवारांची २५/१६ कि.मी. चालण्याची शारिरीक क्षमता चाचणी खालील वेळापत्रकानुसार आयोजित करण्यांत येत आहे. चालण्याची शारीरिक क्षमता चाचणी जेथून सुरु होणार आहे व जिथे संपणार आहे त्या ठिकाणाचा नकाशा समवेत दिला आहे.**

| दिनांक | वेळ | उमेदवार (पुरुष/ स्त्री) | सुरूवातीचे ठिकाण | अंतिम ठिकाण |
|---|---|---|---|---|
| ०५/०५/२०१७ | सकाळी ०७.०० वा. | पुरूष उमेदवार | मौजे धामणगांव, ता. भिवंडी येथील बृहन्मुंबई महानगरपालिका पाणीपुरवठा कार्यालय (वडपे भिवंडी रोड, धामणगांव फाटा) ता.भिवंडी, जि.ठाणे | मौजे पिवळी, ता. शहापूर, जि.ठाणे (२५ कि.मी. अंतरावर) |
| ०५/०५/२०१७ | सकाळी ०७.०० वा. | महिला उमेदवार | मौजे धामणगांव, ता. भिवंडी येथील बृहन्मुंबई महानगरपालिका पाणीपुरवठा कार्यालय (वडपे भिवंडी रोड, धामणगांव फाटा) ता.भिवंडी, जि.ठाणे | मौजे पाच्छापूर, ता. भिवंडी, जि.ठाणे (१६ कि.मी. अंतरावर) |

तसेच २५ कि.मी. पुरूष उमेदवारासाठी व १६ कि.मी. स्त्री उमेदवारासाठी चालण्याची शारीरिक क्षमता चाचणीकरीता पात्र उमेदवारांनी खालीलप्रमाणे सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१. उमेदवारांना चालण्याच्या शारीरिक क्षमता चाचणीकरीता येताना मे. महाऑनलाईन लिमिटेड या संस्थेच्या संकेतस्थळावरुन देण्यात आलेल्या ओळखपत्राची (Admit Card) प्रत समवेत आणावयाची आहे. अशा ओळखपत्राशिवाय (Admit Card) उमेदवारांना चालण्याच्या शारीरिक क्षमता चाचणीकरीता प्रवेश दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच उमेदवाराने स्वत:ची ओळख पटविणेकरीता खालीलपैकी कोणतेही एक मूळ ओळखपत्र व त्याची स्वत: स्वाक्षांकीत केलेली छायांकीत प्रत (झेरॉक्स) सोबत आणावी.
१. आधार कार्ड २. पॅन कार्ड ३. मतदान ओळखपत्र ४. शाळा/कॉलेज यांनी अदा केलेले ओळखपत्र ५. वाहन परवाना इ.

२. **उमेदवार दिलेल्या दिनांका दिवशी व वेळेत दिलेल्या ठिकाणी उपस्थित राहिले नाहीत तर त्यांना पुन्हा संधी दिली जाणार नाही. गैरहजर राहणारे उमेदवार अंतिम निवडीकरीता अपात्र ठरतील व अशा अपात्र उमेदवारांऐवजी प्रतिक्षा यादीतील उमेदवारांचा निवड यादीत समावेश करणेत येईल.**

३. ४ तासांत पुरुष उमेदवारांकरिता २५ कि.मी. व स्त्री उमेदवारांकरिता १६ कि.मी. चालण्याची शारिरिक क्षमता चाचणी करिता दिलेल्या वेळेपुर्वी १ तास अगोदर उमेदवारांनी त्यांना नेमून दिलेल्या ठिकाणी उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

४. चालण्याची क्षमता चाचणीचे वेळापत्रक व चाचणीच्या ठिकाणाचा नकाशा मे. महाऑनलाईन लिमिटेड या संस्थेच्या http://maharecruitment.mahaonline.gov.in व वनविभागाच्या http://mahaforest.gov.inया संकेत स्थळांवर प्रसिध्द करणेंत आलेला आहे.